**<u>ठळक बातम्या</u>**

- नाताळ सणाचा सर्वत्र उत्साह
- माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त देशाचं अभिवादन
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा खासदार क्रीडा महोत्सवातल्या खेळाडूंशी संवाद
- कच्च्या स्वरुपातल्या हिऱ्यांना प्रमाणपत्र जारी करणाऱ्या किंबर्ले प्रोसेस या संस्थेचं उपाध्यक्ष पद आजपासून भारताकडे

**आणि**

- कर्नाटक आणि तमिळनाडूत झालेल्या वेगवेगळ्या अपघातांमधे किमान १७ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

नाताळचा सण आज सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. देशभरातल्या चर्चेस आणि प्रार्थनागृहांमधे काल रात्री प्रभू येशू ख्रिस्ताच्या जन्मोत्सवानिमित्त विशेष प्रार्थनांचं आयोजन करण्यात आलं होतं. चर्चेसवर रोषणाई करण्यात आली आहे. नाताळनिमित्त भेटवस्तू घेऊन येणाऱ्या सांताक्लॉजच्या प्रतिकृती लक्ष वेधून घेत आहेत. दुकानं, मॉल्स, उपाहारगृहं आणि पर्यटनस्थळांवर गर्दी झाली आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी देशवासियांना नाताळनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या सणातून शांती, सलोखा, समता आणि सेवेचा संदेश समाजाला मिळतो असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. येशू ख्रिस्तांची शिकवण सामाजिक नात्यांचे बंध दृढ करते आणि शांततेचा पुरस्कार करते अशा शब्दात उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दिल्लीतल्या कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशनमधे जाऊन सामूहिक प्रार्थनेत भाग घेतला. नाताळचा सण समाजात सद्भावना आणि

सलोखा निर्माण करतो असं त्यांनी शुभसंदेशात म्हटलं आहे. नाताळ निमित्त आज मुंबईतले शेअर, वस्तू, आणि वायदे बाजार बंद आहेत.

**<><><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतल्या सदैव अटल या समाधीस्थळी जाऊन वाजपेयी यांना आदरांजली वाहिली. अटल बिहारी वाजपेयींनी आपलं संपूर्ण जीवन राष्ट्रनिर्माण आणि सुशासनासाठी समर्पित केलं, असं प्रधानमंत्री मोदी आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाले. वाजपेयी यांचं व्यक्तिमत्व, कार्य आणि नेतृत्व देशाच्या विकासाच्या कार्यात सदैव मार्गदर्शक राहील अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

माजी उपराष्ट्रपती वैंकय्या नायडू, लोकसभा सभापती ओम बिर्ला, राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश, केंद्रीय मंत्री जे पी नड्डा, किरेन रिजिजु यांनीही अटल बिहारी वाजपेयी यांना आदरांजली वाहिली. तसंच संसद सदस्यांनी संविधान सदनात वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केलं.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबईत अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त ‘राष्ट्रनायक यांचा जीवन प्रवास’ या चित्रप्रदर्शनाचं उद्घाटन केलं. यावेळी भाजपाचे राष्ट्रीय सह संघटन महामंत्री शिवप्रकाश, मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई भाजपा अध्यक्ष अमित साटम उपस्थित होते.

**<><><><><>**

पंडित मदन मोहन मालवीय यांच्या जयंतीनिमित्त उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

संसद खेल महोत्सव देशाच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावत असून खेळामुळे जय-पराजयाच्या पलीकडे जात तरुणांमधे खिलाडूवृत्ती रुजत असल्यामुळे सक्षम आणि शिस्तबद्ध तरूण घडत आहेत, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. संसद खेल महोत्सवाचं दूरस्थ पद्धतीने उद्घाटन केल्यानंतर ते आज बोलत होते. हेच तरूण पुढे राष्ट्र उभारणीत योगदान देणार आहेत, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी**

संसद खेल महोत्सवामुळे देशाला हजारो खेळाडू मिळाले असून या महोत्सवाची व्याप्ती आणि प्रभाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. २०३० मधे भारतात राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचं आयोजन केलं जाणार असून २०३६ ला ऑलिम्पिकचं आयोजन करण्यासाठीही आपण प्रयत्नशील असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. या स्पर्धांमधे जे सहभागी होतील ते आता दहा ते पंधरा वर्षांचे आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रतिभेला वाव देणं गरजेचं आहे. संसद खेल महोत्सव अशा खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देतो असं प्रधानमंत्री म्हणाले. सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावं असं आवाहनही त्यांनी केलं. यावेळी केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय हेही दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते.

**<><><><><>**

वीर बाल दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्या नवी दिल्लीत 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहेत. या पुरस्कारासाठी यंदा १८ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या २० मुलांची निवड करण्यात आली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या कार्यक्रमात उपस्थित मुलांना तसंच तरुणांना संबोधित करतील.

**<><><><><>**

कच्च्या स्वरुपातल्या हिऱ्यांना प्रमाणपत्र वितरित करणाऱ्या किंबर्ले प्रोसेस या संस्थेचं उपाध्यक्ष पद आजपासून भारत स्वीकारत आहे. अवैध कारवायांना पाठबळ देण्यासाठी होणारा हिऱ्यांचा व्यापार रोखण्यासाठी किंबर्ले प्रोसेस ही संस्था २००३ मधे स्थापन झाली, यात जगभरातली सरकारं, हिरे उद्योग तसंच सामाजिक संघटनांचा समावेश आहे. जानेवारीपासून भारत या संस्थेचं अध्यक्षपद भूषवणार आहे. पारदर्शक व्यापाराविषयी भारताच्या वचनबद्धतेवर जगाचा विश्वास असल्याचं यामुळे सिद्ध होतं, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल याविषयी बोलताना म्हणाले. किंबर्ले प्रोसेस या यंत्रणेत सध्या ६० पेक्षा जास्त देश सहभागी आहेत. त्यामुळे हिरे व्यापाराचं नियमन करणारी ही सर्वात मोठी संस्था बनली आहे.

**<><><><><>**

देशातला सर्वात जुना हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत महोत्सव म्हणून ओळखला जाणारा दीडशेवा श्री बाबा हरिवल्लभ संगीत संमेलन उद्यापासून पंजाबमध्ये जालंधर इथे सुरू होत आहे. तीन दिवस चालणारा हा महोत्सव शिखांचे गुरू तेग बहादूर यांचा साडे तीनशेवा शहीद दिन आणि बनारस घराण्याचे प्रसिद्ध गायक दिवंगत पंडीत छन्नुलाल मिश्रा यांच्या स्मृतींना समर्पित असेल. या महोत्सवात विदुषी अवस्थी, पंडित साजन मिश्रा, पंडित रोणू मुजुमदार, अश्विनी भिडे, पंडित संजीव अभ्यंकर, सस्किया राव-दे-हास, व्ही सेल्वागणेश, नवीन शर्मा आणि शिखरनाद कुरेशी आपली संगीत कला सादर करतील.

**<><><><><>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आजपासून व्यावसायिक उड्डाणं सुरू झाली. आज सकाळी आठ वाजता बेंगळुरूहून आलेलं पहिलं विमान धावपट्टीवर उतरलं. या विमानाला हवेत पाण्याचे फवारे सोडून सलामी देण्यात आली. तर सकाळी पावणे नऊ वाजता या विमानतळावरून हैदराबादच्या दिशेने पहिलं विमान आकाशात झेपावलं. सध्या या विमानतळावरून देशभरातल्या नऊ विमानतळांवर

विमान प्रवास सुरू करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात सकाळी आठ ते रात्री आठ अशी बारा तासापुरती विमानसेवा सुरू राहील.

**<><><><><>**

कर्नाटकात चित्रदुर्ग इथं आज पहाटे झालेल्या अपघातात किमान १० जण ठार झाले. एक भरधाव ट्रक एका प्रवासी बसला आदळून तिला आग लागली आणि बसमधले प्रवासी होरपळून मृत्यूमुखी पडले. या दुर्घटनेत १२ जण जखमी झाले असून एकाची प्रकृती गंभीर आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे.

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी ५ लाख आणि जखमींना ५० हजार रुपये द्यायची घोषणा केली आहे.

**<><><><><>**

तमिळनाडूत तिरुचिरापल्ली-चेन्नई राष्ट्रीय महामार्गावर काल अपघात होऊन ७ जणांचा मृत्यू झाला. तमिळनाडू राज्य परिवहन मंडळाच्या बसचं टायर फुटल्यानं चालकाचं बसवरचं नियंत्रण सुटलं आणि ही बस दोन कारवर आदळली. यात कारमधून प्रवास करणारे सात जण जागीच ठार झाले.

**<><><><><>**

भारतीय पुरुष हॉकी संघाचा उपकर्णधार आणि दोन वेळा ऑलिंपिक कांस्यपदक विजेता हार्दिक सिंग याला देशातील सर्वोच्च क्रीडा सन्मान, मेजर ध्यानचंद खेलरत्नसाठी नामांकन देण्यात आले आहे.

ऑलिंपिक पदक विजेता आणि भारतीय हॉकी संघटनेचे उपाध्यक्ष गगन नारंग यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने आज नामांकनावर शिक्कामोर्तब केलं.

**<><><><><>**

जपाननं अण्वस्त्रं बाळगायला हवीत अशा जपानच्या एका सुरक्षा अधिकाऱ्यानं,केलेल्या विधानाचा जपानमधल्या अणुबॉम्ब हल्ल्यातून वाचलेल्या नागरिकांच्या चार संघटनांनी निषेध केला आहे. याबाबतचं निवेदन त्यांनी एका वार्ताहर परिषदेच्या माध्यमातून जारी केलं.

अण्वस्त्र बाळगण्याबाबतची इच्छा, दावा स्वीकारार्ह नसल्याचं या गटांनी म्हटलं आहे. त्याऊलट जपान सरकारनं अण्वस्त्र बाळगणं, अण्वस्त्रांची निर्मिती तसंच देशात अण्वस्त्रं आणण्याला मनाई करणाऱ्या देशाच्या अण्वस्त्रमुक्ततेच्या तत्त्वांचं पालन करायला हवं असं या गटांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

उत्तर कोरियाचे नेते किम जोंग उन यांनी काल एका पाणबुडीची निर्मितीचा आणि जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्राच्या चाचणीचा आढावा घेतला. अण्वस्त्रसज्ज असलेलं हे क्षेपणास्त्र २०० किलोमीटर लांब असलेल्या लक्ष्याचा वेध घेऊ शकतं.

**//<><><><><>//**